# प्रकरण पाचवे

## सारांश, निष्कर्ष व शिफारशी

५.० प्रस्तावना

५.१ सारांश

५.२ निष्कर्ष

५.३ अनुमान

५.४ शिफारशी

५.५ प्रस्तुत संशोधनाशी संबंधित पुढील संशोधनासाठी क्षेत्रे/विषय

# प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ५.० प्रस्तावना

ज्ञान, विज्ञान, आणि तंत्रज्ञान यांचा प्रस्फोट झालेला आहे. विज्ञानाची घौडदौड वेगाने सुरू आहे, अनेक आधुनिक तंत्रे, साधने, माध्यमे यांच्या सहाय्याने दळण-वळण घडून येत आहे. असे असले तरी आज देखील वर्गातील महत्वाचा घटक हा शिक्षक संप्रेषक आहे.

वर्गातील प्रभावी संप्रेषण प्रक्रिया ही शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या प्रभावीपणावर अवलंबून आहे. शिक्षक संप्रेषकांचा दर्जा, गुणवत्ता जेवढी उच्च राहील तेवढे शिक्षणाचा दर्जा देखील उच्च रहाणार आहे. यासाठीच शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिकांचा अवबोध तसेच त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन निश्चित करणाऱ्या विविध घटकांच्या विश्लेषणाची गरज आहे. ज्यामधून शिक्षक संप्रेषकाची गुणवत्ता वाढविण्यास मदत होईल.

## ५.१ सारांश

शिक्षक संप्रेषकांच्या स्व-भूमिकांचा अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन-एक अभ्यास हे संशोधन शिवाजी विद्यापीठाशी सलग्नित कोल्हापूर शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक संप्रेषकांशी संबंधित आहे. संशोधकाने शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध आणि वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन या दोहांतील संबंध अभ्यासला आहे.

**संशोधन समस्येचे शब्दांकन**

शिक्षक संप्रेषकांच्या स्व-भूमिकांचा अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन-एक अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे**

(१) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या स्व-भूमिकांचा अवबोध तसेच त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(२) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिकांचा अवबोध तसेच त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(३) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे व्यवस्थापकीय भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(४) बी.ए.बी.एड् प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे व्यवस्थापकीय भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(५) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(६) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(७) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे संशोधक भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(८) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे संशोधक भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(९) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे विस्तार कार्य भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(१०) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाचे विस्तार कार्य भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(११) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे समुपदेशकाच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(१२) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे समुपदेशकाच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(१३) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे अध्यापकाच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

(१४) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे अध्यापकाच्या भूमिकेला अनुसरून वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन शोधणे.

**संशोधनाची गृहितके**

प्रस्तुत संशोधन पुढील गृहितांवर आधारलेले आहे.

१) शिक्षक संप्रेषकांमध्ये पुढील सहा स्व-भूमिकांचा अवबोध असतो.

(१) व्यवस्थापकीय भूमिका.

(२) अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका.

(३) संशोधकाची भूमिका.

(४) विस्तार कार्याची भूमिका.

(५) समुपदेशकाची भूमिका.

(६) अध्यापकाची भूमिका.

२) शिक्षक संप्रेषकांच्या वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनामध्ये पुढील सोळा घटकांचा समावेश आहे.

(१) सर्वसामान्य व्याख्यानाची क्षमता.

(२) जागरूकपणे केलेली अनुदेशनात्मक हालचाल.

(३) संघटीत आशय बांधणीसाठी फलक लेखन.

(४) शिक्षकांचे बेजबाबदार वर्तन आणि प्रतिसाद.

(५) नियंत्रित ओघवतेपणा.

(६) सुसंगतपणाचा अभाव.

(७) शिक्षकाचा सामाजिक भावनिक समतोल.

(८) भाषिक क्षमतेचा अभाव.

(९) अशाब्दिक माध्यमांचा वेळेवर केलेला वापर.

(१०) आशय बांधणींची प्रवृत्ती.

(११) शिक्षकाचा दर्जा राखणे.

(१२) शिक्षकानीं हेतूपूर्वक केलेल्या शारिरीक हालचाली.

(१३) स्विकार्य अश्या प्रभुत्वाचा अभाव.

(१४) जागरूक सुसंगतता.

(१५) हावभाव व आवाजातील बदल.

(१६) अध्यापनातील प्रभावी व्यवस्थापनाचा अभाव.

**परिकल्पना**

पुढील सर्व परिकल्पना बी.एड्. आणि बी.ए.बी.एड् प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांना लागू आहेत.

(१) शिक्षक संप्रेषकांची व्यवस्थापकीय भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

(२) शिक्षक संप्रेषकांची अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

(३) शिक्षक संप्रेषकांची संशोधकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

(४) शिक्षक संप्रेषकांची विस्तार कार्याची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

(५) शिक्षक संप्रेषकांची समुपदेशकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

(६) शिक्षक संप्रेषकांची अध्यापकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध सार्थक नसतो.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून शिवाजी विद्यापीठाशी सलंग्नीत असणाऱ्या कोल्हापूर शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन पाहिले आहे.

**सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने**

प्रस्तुत संशोधात सामग्री गोळा करण्यासाठी संशोधकाने पुढील साधनांचा वापर केला.

(१) वरीअर एल.आर. (१९९७) यांनी प्रमाणित केलेली शिक्षक संप्रेषकांच्या स्व-भूमिकांच्या अवबोधाचे मापन करणारी पद्निश्चयन श्रेणी (परीशिष्ट 'ब')

(२) कुलकर्णी व्ही. जी.(१९९५) यांनी प्रमाणित केलेली वर्गाध्यापन व व्यवस्थापकीय वर्तन विश्लेषण श्रेणी संच (परीशिष्ट 'क')

**नमुना निवड**

कोल्हापूर शहरातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व शिक्षक संप्रेषकांची व ५० टक्के शिक्षक प्रशिक्षणार्थिंची निवड केली त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

**शिक्षक संप्रेषक**

| | | |
|---|---|---|
| चार बी.एड्. महाविद्यालयातील | - | २८ |
| एका बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील | - | १३ |
| एकूण | | ४१ |

**शिक्षक प्रशिक्षणार्थी**

| | | |
|---|---|---|
| चार बी.एड्. महाविद्यालयातील | - | १६० |
| एका बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील | - | १६० |
| एकूण | | ३२० |

**आधार सामग्री विश्लेषण**

**१) स्व-भूमिका अवबोध**

शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध पहाण्यासाठी पद्निश्चयन श्रेणी वापरली. या श्रेणीमध्ये सहा भूमिकांचे मिळून साठ संच आहेत. प्रत्येक संच तीन विधानांनी बनलेला आहे. या तीन विधानापैकी एक विधान अनुकूल, दुसरे थोडया प्रमाणात अनुकुल तर तिसरे प्रतिकूल आहे. प्रत्येक संचात ही तीन विधाने उलट-सुलट क्रमाने आली आहेत.

प्रतिकूल विधानांना १, थोड्या प्रमाणात अनुकूल विधानांना २ व अनुकूल विधानांना ३ गुण देऊन प्रत्येक भूमिकांच्या गुणांची बेरीज करून त्यांचे तीन भागात वर्गीकरण केले. १ ते १० मध्ये जर गुण असतील तर त्या शिक्षक संप्रेषकांच्या भूमिकांचा स्तर हा निम्न ठरविला. ११ ते २० मध्ये जर गुण असतील तर मध्यम स्तर व २१ ते ३० मध्ये जर गुण असतील तर उच्च स्तर निश्चित केला.

**२) वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन**

शिक्षक संप्रेषकांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन पहाण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणार्थींकडून वर्गाध्यापन व व्यवस्थापकीय वर्तन विश्लेषण श्रेणी संचाच्या सहाय्याने मते जमा केली. या श्रेणी संचात ३२ विधानातील प्रत्येकी दोन विधाने ही १६ वर्तन घटकांशी निगडीत आहेत. यातील ११ वर्तन घटक हे होकारात्मक आहेत तर ५ वर्तन घटक हे नकारात्मक आहेत.

शिक्षक प्रशिक्षणार्थींकडून विधांनाशी सहमत, निश्चित सांगता येत नाही, असहमत, या पध्दतीने मत नोंदवून घेतले. होकारात्मक घटकांशी संबंधीत सहमत प्रतिसादांना ३ गुण, निश्चित सांगता येत नाही प्रतिसादांना २ गुण आणि असहमत प्रतिसादांना १ गुण या पध्दतीने गुणदान केले. तर नकारात्मक घटकांच्या बाबतीत सहमत प्रतिसादांना १ गुण, निश्चित सांगता येत नाही प्रतिसादांना २ गुण, आणि असहमत प्रतिसादांना ३ गुण असे गुणदान केले.

१६ वर्तन घटकांच्या एकूण गुणांची बेरीज करून त्यांचे तीन भागात वर्गीकरण केले. यातील ० ते १२८० यामध्ये गुण मिळणाऱ्या शिक्षक संप्रेषकांचा वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन स्तर निम्न, १२८१ ते २५६० दरम्यान गुण मिळणाऱ्या शिक्षक संप्रेषकांचा मध्यम स्तर व २५६१ ते ३८४० च्या दरम्यान गुण मिळणाऱ्या शिक्षक संप्रेषकांचा उच्च स्तर निश्चित केला.

शिक्षक संप्रेषकांची उच्च, मध्यम आणि निम्न स्तरामध्ये असलेला स्व-भूमिका अवबोध आणि वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाची टक्केवारी शोधली.

शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामधील संबंध पहाण्यासाठी व परिकल्पनांचे परिक्षण करण्यासाठी काय स्केवअर परीक्षिका **(X test)** वापरली.

### ५.२ निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

(१) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक व्यवस्थापकीय भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(२) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचा तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक व्यवस्थापकीय भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(३) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्ययनाला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याच्या भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(४) बी.ए.बी.एड् प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्ययनाला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याच्या भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(५) बी. एड्. व बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक संशोधकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक(जास्त) आहेत.

(६) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या तुलनेने बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक संशोधकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त)आहेत.

(७) बी.एड. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक विस्तार कार्याची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत. बी.एड्. प्रशिक्षणातील कोणीही शिक्षक संप्रेषक मध्यम स्तरावर नाही.

(८) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचा तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक विस्तार कार्याची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(९) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक समुपदेशकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलेनेने अधिक (जास्त) आहेत बी.एड्. प्रशिक्षणातील कोणीही शिक्षक संप्रेषक निम्न स्तरावर आढळत नाही.

(१०) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाच्या तुलेनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक समुपदेशकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(११) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्यापकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलेनेने अधिक (जास्त) आहेत.

(१२) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाच्या तुलेनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्यापकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(१३) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(१४) बी.ए.बी.एड्. संप्रेषकाच्या तुलेनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(१५) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक व्यवस्थापकीय भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(१६) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाच्या तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक व्यवस्थापकीय भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(१७) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे व्यवस्थापकीय भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन या मध्ये सार्थक संबंध असतो.

(१८) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचा अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(१९) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाचे तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधीक (जास्त) आहेत.

(२०) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबध आहे.

(२१) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक संशोधकाची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्याउच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलने अधिक (जास्त) आहेत.

(२२) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे संशोधकाची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबध आहे.

(२३) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक विस्तार कार्यांची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

२४) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाच्या तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक विस्तार कार्याची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(२५) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचे विस्तार कार्याची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबंध नसतो.

(२६) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक समुपदेशकाची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(२७) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या तुलनेने बी.एड्. प्रशिक्षकातील शिक्षक संप्रेषक समुपदेशकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(२८) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांची समुपदेशकाची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबंध नसतो.

(२९) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्यापकाची भूमिका अवबोध आणि त्याचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

(३०) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षकां संप्रेषकांच्या तुलनेने बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक अध्यापकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

(३१) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाची अध्यापकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबंध असतो.

## ५.३ अनुमान

प्रस्तुत संशोधनाची अनुमाने पुढील प्रमाणे आहेत.

१) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांपैकी व्यवस्थापकीय भूमिका, अध्ययनाला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका, संशोधकाची भूमिका अवबोधापेक्षा विस्तार कार्याची भूमिका, समुपदेशकाची भूमिका आणि अध्यापकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरामध्ये जास्त शिक्षक संप्रेषक आहेत.

२) बी.एड्. प्रशिक्षणातील कोणीही शिक्षक संप्रेषक विस्तार कार्याची भूमिका अवबोधाच्या मध्यम स्तरावर आढळत नाही.

३) बी.एड्. प्रशिक्षणातील कोणीही शिक्षक संप्रेषक समुपदेशकाची भूमिका अवबोधाच्या निम्न स्तरावर आढळत नाही.

४) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांपैकी अध्ययनाला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका, विस्तार कार्याची भूमिका, समुपदेशकाची भूमिका अवबोधापेक्षा व्यवस्थापकीय भूमिका संशोधकाची भूमिका आणि अध्यापकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरामध्ये जास्त शिक्षक संप्रेषक आहेत.

५) बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या तुलनेने बी.एड् प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक व्यवस्थापकीय भूमिका, अध्ययनाला अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका, विस्तार कार्याची भूमिका, समुपदेशकाची भूमिका, अध्यापकाची भुमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

६) बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांच्या तुलनेने बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक संशोधकाची भूमिका अवबोधाच्या उच्च स्तरावर अधिक (जास्त) आहेत.

७) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषक वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनाच्या उच्च स्तरावर मध्यम व निम्न स्तराच्या तुलनेने अधिक (जास्त) आहेत.

८) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांचा व्यवस्थापकीय भूमिका, अध्ययनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची भूमिका, संशोधकाची भूमिका, अध्यापकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबंध आहे.

९) बी.एड्. व बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकाचे विस्तार कार्याची भूमिका, समुपदेशकाची भूमिका अवबोध आणि त्यांचे वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यामध्ये सार्थक संबंध नसतो.

## ५.४ शिफारशी

प्रस्तुत संशोधनामधुन पुढील शिफारशी करता येतील.

### अ) शासन किंवा शैक्षणिक धोरण राबविणारी व्यवस्था

यांना पुढील शिफारशी करता येतील.

१) समाजाची गरज बदलेल त्याप्रमाणे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात बदल घडवून आणावा. शिक्षक संप्रेषकांचा स्व-भूमिका अवबोध तसेच वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन उंचावण्यासाठी, वाढविण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची, उद्बोधन वर्गाची आखणी व अंमलबजावणी करावी.

२) जे शिक्षक संप्रेषक संशोधन करण्यास इच्छुक आहेत त्यांना प्रोत्साहनपर आर्थिक मदत करावी.

३) शिक्षक संप्रेषकांची विविध स्व-भूमिका अवबोध जसा उंचावेल त्याप्रमाणात त्यांना प्रोत्साहनपर बक्षिस, पुरस्कार, वेतनात आर्थिक वाढ द्यावी.

### ब) शिक्षण संस्था

यांना पुढील शिफारशी करता येतील.

१) उमेदवाराची कार्यक्षमता, त्यांचा विविध स्व-भूमिका अवबोधाचा स्तर तपासून शिक्षक संप्रेषक म्हणून नेमणूक करावी.

२) शिक्षक संप्रेषकांवर कार्य करीत असताना कोणतेही दडपण आणू नये तसेच त्यांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. भयमुक्त वातावरणात त्यांना कार्य करण्यास मुभा द्यावी.

### क) शिक्षक संप्रेषक

यांना पुढील शिफारशी करता येतील.

१) विविध स्व-भूमिकांचा अवबोध वाढविण्यासाठी नवीन माहिती, तंत्र, ज्ञान यांची माहिती करून घेऊन वर्गाध्यापनात, समाजात वावरत असताना हे ज्ञान, माहिती, तंत्र यांचा वापर करावा.

२) वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन वाढविण्यासाठी वर्तन विश्लेषणातील होकारात्मक घटक अधिकाधिक वर्गाध्ययापनात कसे येतील ते पहावे व वर्तन विश्लेषणातील नकारात्मक घटकांचा त्याग करावा.

३) स्व-भूमिकांचा अवबोध तसेच वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन जेवढे उच्च तेवढे वर्गाध्यापनात प्रभावी किंवा परिणामकारक संप्रेषण घडून येते याची जाणिव सतत ठेवावी.

**ड) शिक्षक प्रशिक्षणार्थी**

यांना पुढील शिफारशी करता येतील.

१) शिक्षक प्रशिक्षणार्थी हे भावी शिक्षक असतात, समाज निर्मिती मध्ये त्यांचे योगदान महत्वाचे असते, भावी पिढीचा विकास यांच्यांकडूनच होणार असतो. परंतू हे सर्व जर प्रभावी किंवा परिणामकारक संप्रेषण वर्गाध्यापनात घडुन आले तरच शक्य आहे. यासाठीच शिक्षक प्रशिक्षणार्थींनी शिक्षक प्रशिक्षण घेत असतानाच स्व-भूमिका अवबोध तसेच वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन स्वत:मध्ये रूजविण्याचे प्रयत्न करावेत जेणेकरून शिक्षक बनल्यानंतर त्यांना वर्गाध्यापनात प्रभावी संप्रेषण घडवून आणता येईल.

**५.५ प्रस्तुत संशोधनाशी संबंधित पुढील संशोधनासाठी क्षेत्रे किंवा विषय**

प्रस्तुत संशोधनाशी संबंधित व्यापक व विस्तृत संशोधन करण्यासाठी पुढील क्षेत्रे किंवा विषय सांगता येतील.

१) प्रस्तुत संशोधन हे फक्त कोल्हापूर शहरापुरतेच मर्यादित आहे. अधिक नमुना घेऊन संशोधनाचा विस्तार वाढवून संशोधन करता येईल.

२) प्रस्तुत संशोधन हे बी.एड्. तसेच बी.ए.बी.एड्. प्रशिक्षणातील शिक्षक संप्रेषकांपुरतेच मर्यादीत आहे. असेच संशोधन डी.एड्. तसेच माध्यमिक स्तरावरील शिक्षक संप्रेषकांच्या बाबतीत करता येईल.

३) प्रत्येक स्व-भूमिका अवबोध आणि वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन असे संशोधन करता येईल.

४) प्रत्येक स्व-भूमिका अवबोध आणि वर्गातील व्यवस्थापकीय वर्तनातील एक घटक असे संशोधन करता येईल.

५) डी.एड्., बी.एड्., बी.ए.बी.एड्. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील स्त्री व पुरूष शिक्षक संप्रेषकांच्या व-भूमिका अवबोध आणि वर्गातील व्यवस्थापकीय वर्तन यावर संशोधन करता येईल.